# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/01/2024 (बुधवार) दुपार

---

### मोटरसायकल चोरी

**१) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ०.५ कि. मी. अंतरावरील जयस्तंभ चौक मौदा येथे दिनांक ०७/०१/२०२४ चे १८.०० वा. ते १८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— राजेश्वर त्रशीदेव घोडमारे, वय ४८ वर्ष, रा. मौदा हा दिनांक ०७/०१/२०२४ रोजी सायं ०६.०० वा. दरम्यान गुजरी बाजार मौदा येथे मोटरसायकल क्र. एम. एच. —४०/बीटी—६७०८ ने बाजार करणे करीता गेले असता चौकात गाडी लावुन बाजार करायला गेले बाजार करून परत आले ठेवलेल्या ठिकाणी मोटरसायकल दिसली नाही आजुबाजुला बघीतले असता सदर मोटरसायकल मिळुन आली नाही मोटरसायकल किंमती ३५,०००/—रू. ही कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस हवालदार संदीप नागोसे यांनी भेट दिली असुन अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार असलम नवरंगाबादे मो. नं. ८६६८८१६०४९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील आठवडी बाजार कळमेश्वर येथे दिनांक ०७/०१/२०२४ चे १६.०० वा. ते १८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— नित्यानंद श्रीराम परतेकी वय ३८ वर्ष रा. वार्ड क्र. २ लोहगड यांची पॅशन प्रो मोटरसायकल क्र. एम. एच— ४०/ए. वाय— ३७९९ किंमती २०,०००/— रू. ही अज्ञात चोराने आठवडी बाजार कळमेश्वर येथून चोरून नेलेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी सहायक फौजदार सुनिल मिश्रा यांनी भेट दिली असुन अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सुनिल मिश्रा मो. क्र. ९९२३६९४४६७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर